आजचा शुभ विचार
जे इतिहास विसरतात, ते इतिहास घडवू शकत नाहीत.'इतिहास कधी विसारायचा नसतो. त्यातून अनेक गोष्टी शिकायच्या असतात. ज्या चुका इतिहासात झाल्या त्या पुन्हा होऊ द्यायच्या नसतात.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923
SWARAJYADOOT
# स्वराज्यदूत
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-14 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 14 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक १४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. १४ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

# “दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून बदला घेतला”

## पंतप्रधान मोदींचं ऑपरेशन सिंदूरबाबत भाष्य; जवानांचं केलं कौतुक

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (१३ मे) आदमपूर हवाई एअरबेसवर जाऊन भारतीय जवानांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जवानांचं कौतुक केलं. तसेच 'भारत माता की जय... या घोषणेची ताकद जगाने पाहिली, जेव्हा आपल्या बहिणींचं सिंदूर हिसकावून घेतलं गेलं, तेव्हा दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांना मारलं, असं म्हणत भारत बुद्धांची देखील धरती आणि गुरु गोविंद सिंह यांची देखील धरती आहे', असं भाष्य



पंतप्रधान मोदी यांनी केलं.

“भारत माता की जय... या घोषणेची ताकद नुकतीच जगाने पाहिली. ही फक्त घोषणा नाही, तर देशातील प्रत्येक जवानांची एक शपथ आहे. जे जवान भारत मातेच्या सन्मान आणि प्रतिष्ठेसाठी जीवाची बाजी लावतात, त्या प्रत्येक सैनिकाची ही शपथ आहे. देशातील प्रत्येक नागरिकांचा हा आवाज आहे. भारत माता की जय...हा आवाज मैदानात देखील घुमतो आणि 'मिशन'मध्ये देखील घुमतो”, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. “भारताचे सैनिक जेव्हा भारत माता की जय बोलतात, तेव्हा दुश्मनांचा थरकाप उडतो. जेव्हा आपलं मिसाईल निशाण्यावर पोहोचतं तेव्हा दुश्मनांना देखील भारत माता की जय ही घोषणा ऐकायला जाते. जेव्हा आमची सेना न्यूक्लिअर बॉमच्या धमकीची हवा काढतात, तेव्हा आकाशापासून ते पातळापर्यंत एकच आवाज घुमतो तो म्हणजे भारत माता की जय...,भारतीय जवानांनी सर्व भारतीयांची मान उंचावली आहे”, असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं. “आज सकाळीच मी आपल्याला भेटायला आणि दर्शनासाठी आलो. जेव्हा वीरांच्या दर्शनाचा योग येतो, तेव्हा जीवन धन्य होतं. आज मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. येणाऱ्या पिढीसाठी आपले जवान प्रेरणा आहेत. मी देशातील जवानांना सलाम करतो. 'ऑपरेशन सिंदूर' हे कोणतं साध अभियान नाही, तर निर्णायक क्षमताचं त्रिवेणी आहे. भारत बुद्धांची देखील धरती आहे आणि गुरु गोविंद सिंह यांची देखील धरती आहे. गुरु गोविंद सिंहजी यांनी म्हटलं होतं की, सवा लाख से एक लड़ाऊं, चिड़ियन ते मैं बाज तुड़ाऊं, तबै गुरु गोबिंद सिंह नाम कहाऊं, आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणं ही आपली परंपरा आहे. जेव्हा आपल्या बहिणी आणि मुलींचं सिंदूर हिसकावून घेतलं गेलं, तेव्हा आपण दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून त्यांचे पंख छाटले”, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं.

# संगमनेर मधील थोरात कारखान्याच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कॉँग्रेस नेते बाळासाहेब थोरात तर पांडुरंग घुले उपाध्यक्ष

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे माजी मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात तर उपाध्यक्षपदी ज्येष्ठ संचालक पांडुरंग घुले यांची आज बिनविरोध निवड झाली. अलीकडेच कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूकही बिनविरोध झाली होती. त्यानंतर पदाधिकारी म्हणून कोणाची निवड होते याची उत्सुकता निर्माण झाली होती. कारखान्याच्या अतिथीगृहात आज प्रादेशिक सहसंचालक संतोष बिडवाई यांच्या अध्यक्षतेखाली वरील निवडी झाल्या. अध्यक्षपदासाठी बाळासाहेब थोरात यांच्या नावाची सूचना संपतराव गोडगे यांनी मांडली, त्यास संतोष हासे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष पदासाठी पांडुरंग घुले यांच्या नावाची सूचना विजय राहणे यांनी मांडली. विलास शिंदे यांनी त्यास अनुमोदन दिले. यावेळी सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळ, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, प्रादेशिक



कार्यालयाचे उमेश कुलकर्णी, प्रवीण चव्हाण आदी उपस्थित होते. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, बाजीराव खेमनर, ॲड. माधवराव कानवडे, मावळते अध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, दूध संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह देशमुख, डॉ.जयश्री थोरात, लक्ष्मणराव कुटे, अमृतवाहिनी बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी, बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर, तालुका शेतकी संघाचे अध्यक्ष संपतराव डोंगरे आदीसह तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी थोरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या शिस्त, काटकसर, पारदर्शकता या आदर्श तत्त्वावर व विचारांवर संगमनेरचा सहकार व कारखान्याचे काम सुरू आहे. सर्व निर्णय एकमताने आणि एक विचाराने घेतल्याने यशस्वी वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीमध्ये अनेक अडचणी आहेत. खासगी साखर कारखान्यांच्या आव्हानामुळे स्पर्धा वाढली आहे. यापुढील काळातही यशस्वी वाटचाल आपल्या सर्वांना कायम ठेवायची आहे. आपण तालुक्यात नेहमीच सुसंस्कृत राजकारण केले विरोधकांचाही कधी आपण व्यक्तीद्वेष केला नाही. मात्र आता काळजी करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यात दहशत वाढते की काय असा प्रश्न आहे. सर्वसामान्यांच्या जीवनावर काय परिणाम होईल याचा विचार करायला हवा. कुणाचीही गुलामगिरी स्वीकारता कामा नये. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यकर्त्यांना मोठी संधी आहे. सर्वांनी आपसातील मतभेद विसरून एकजुटीने लढावे लागेल असेही ते म्हणाले. डॉ. तांबे, नवनिर्वाचित उपाध्यक्ष घुले, मावळते अध्यक्ष ओहोळ, यांचीही यावेळी भाषणे झाली.

> जनतेच्या आशीर्वादाने व नेतृत्वाच्या विश्वासाने राज्यभरात महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली. या पदांचा उपयोग तालुक्याच्या विकासासाठी केला. विधानसभेच्या निवडणुकीत अपघात झाला. परंतु यापुढे सर्वांनी एकजुटीने एकत्र येऊन काम करायचे आहे. पक्ष नेतृत्वाने विश्वास दाखवत काँग्रेसच्या राष्ट्रीय समितीमध्ये पहिल्या २१ जणांमध्ये आपला समावेश आहे. सध्या गुजरातची जबाबदारी आहे. हा सन्मान तालुक्याच्या जनतेचा असून यापुढेही सर्वांनी एकजुटीने काम करावे.
>
> **माजी मंत्री बाळासाहेब थोरात**
> **अध्यक्ष, थोरात साखर कारखाना, संगमनेर**

# 'रॅथ ऑफ गॉड' ही कट्टरपंथीयांना हेरुन संपवणारी मोहीम काय होती? मोसादने जगासमोर काय उदाहरण ठेवलं?

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

२२ एप्रिल २०२५ या दिवशी काश्मीरच्या पहलगाम या ठिकाणी दहशतवाद्यांनी हल्ला करुन २६ निरपराध पर्यटकांना धर्म विचारुन ठार केलं. या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याची बाब समोर आली. त्यानंतर भारताने पाकिस्तानला ऑपरेशन सिंदूर राबवत एअर स्ट्राईक आणि सर्जिकल स्ट्राईक करत उत्तर दिलं. या मध्ये १०० हून अधिक दहशतवादी मारले आणि त्यांचे दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. पाकिस्तानला लक्षात राहिल असा धडा भारताने शिकवला. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. १० मे रोजी दोन्ही देशांनी शस्त्रविराम केला. यानंतर अनेकांना रॅथ ऑफ गॉड या इस्रायलच्या खास मोहीमेची आठवण आली आहे. ही मोहीम काय होती? या मोहिमेतून इस्रायलने पॅलेस्टाईनला उत्तर कसं दिलं ते समोर आलं आहे.

### १९७२ मध्ये काय घडलं?

१९७२ मध्ये म्हणजेच ५३ वर्षांपूर्वी जर्मनीने ऑलिम्पिक स्पर्धेचं आयोजन केलं होतं. यातून जर्मनीला हा संदेश द्यायचा होता की आम्ही आता बदललो आहोत. १९३६ मध्ये हिटलरने जर्मनीत ऑलिम्पिकची स्पर्धा घेतली होती. त्यानंतर १९७२ ला ऑलिम्पिक घेण्यात आलं. ज्याचा विषय निघाला तरीही एक नकोशी आठवण जगाला येते. ५ सप्टेंबर १९७२ ला पहाटे चारच्या दरम्यान 'ब्लॅक सप्टेंबर' या पॅलेस्टिनी कट्टरपंथी गटाने ऑलिम्पिक व्हिलेजमध्ये प्रवेश केला. म्युनिकच्या ऑलिम्पिक व्हिलेजमध्ये आल्यानंतर या कट्टरपंथीयांनी इस्रायलचे ॲथलिट जिथे थांबले होते तो फ्लॅट गाठला. एका मास्टर की ने तो फ्लॅट उघडला. त्यावेळी पॅलेस्टाईनच्या कट्टरपंथीयांनी दोन ॲथलिट्सना ठार केलं. त्यानंतर इस्रायलच्या नऊ ॲथलिटना काही कोच मंडळींना बांधलं आणि ताब्यात घेतलं. त्यांना ओलीस ठेवून मागणी केली की पॅलेस्टाईनच्या २०० कैद्यांची सुटका करा. या सगळ्यांना इस्रायलच्या तुरुंगात ठेवण्यात आलं होतं. पॅलेस्टाइनचे हे कट्टर पंथीय सगळ्या ओलिसांना घेऊन जर्मनीतल्या एका विमानतळावर गेले. तिथे जर्मनीच्या सुरक्षा दलांनी ओलिसांना सोडवण्यासाठी




प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. जर्मनीतल्या सुरक्षा दलांनी हा प्रयत्न केल्याने पॅलेस्टाईनचे कट्टर पंथीय चांगलेच चवताळले आणि त्यांनी एक एक करुन ओलिसांची हत्या करण्यास सुरुवात केली. इस्रायल ऑलिम्पिक समितीच्या नऊ सदस्यांनाही त्यांनी ठार केलं. या दरम्यान पश्चिम जर्मनीतले एक पोलीस अधिकारीही ठार झाले.

### इस्राएलचा जर्मनीवर आरोप काय?

जर्मन सुरक्षा दलांची पॅलेस्टाईन कट्टरतावाद्यांशी जी चकमक झाली त्यात आठ पैकी पाच जण मारले गेले. त्यानंतर अदनान अल गाशे, जमाल अल गाशे आणि मोहम्मद सफादी यांना जर्मनीच्या पोलिसांनी ताब्यात घेतलं. पण नंतर त्यांना सोडावं लागलं. कारण पॅलेस्टाईनच्या कट्टर पंथीयांनी जर्मनीच्या लुफ्तांसा एअरलाईन्सचं अपहरण केलं आणि लोकांच्या सुटकेच्या बदल्यात या तिघांची सुटका करुन घेतली. या तिघांना नंतर लिबियाला पाठवलं गेलं होतं. गडाफीने या तिघांना हिरो जाहीर केलं. त्यानंतर ब्लॅक सप्टेंबर या कट्टर पंथीयांच्या समूहात जे सहभागी होते त्यांची हत्या करण्यात आली. या हत्यांचा आरोप इस्रायलच्या गुप्तचर यंत्रणांवर लावण्यात आला. इस्रायलने या हत्यांसाठी जी विशेष मोहीम राबवली गेली त्या मोहिमेचं नाव होतं 'रॅथ ऑफ गॉड'. या मोहिमेत १९९० पर्यंत ब्लॅक सप्टेंबरमध्ये असलेल्या सगळ्यांचा खात्मा झाला फक्त जमाल अल गाशे हा वाचला. साधारण १० ते १२ वर्षांपूर्वी इस्रायलच्या काही गुप्त फाईल्स समोर आल्या होत्या. त्यात इस्रायलने म्युनिकमध्ये ज्या त्यांच्या खेळाडूंच्या हत्या झाल्या त्यासाठी जर्मनीच्या सुरक्षा दलांना जबाबदार धरलं होतं. ऑलिम्पिकची सुरक्षा पाहणारे पोलीस आणि जर्मनीतले पोलीस हे आमच्या खेळाडूंना आणि त्यांच्या प्रशिक्षकांना वाचवू शकले नाहीत असं त्यांनी म्हटलं होतं. या भीषण नरसंहारानंतरही ऑलिम्पिकची स्पर्धा १९७२ मध्ये पार पडली होती. या स्पर्धेत जर्मनीने २० पदकं जिंकली होती.

### रॅथ ऑफ गॉड मोहीम काय होती?

इस्रायलचे त्यावेळचे पंतप्रधान गोल्डा मेयर यांनी त्यांच्या संसदेत दहशतवादाविरोधात आमचं युद्ध होणार अशी घोषणा केली. आमच्या देशातील खेळाडूंची हत्या ज्यांनी केली त्यांना आम्ही सोडणार नाही असंही ते म्हणाले. त्यानंतर हल्ल्यासाठी जे लोक जबाबदार होते त्यांची ओळख पटावी म्हणून एक गुप्त समिती तयार केली. त्यानंतर इस्रायलच्या गुप्तचर यंत्रणांपैकी मोसादला या पॅलेस्टाईन कट्टरपंथीय आणि त्यांचे सूत्रधार या सगळ्यांची हत्या करा असे आदेश देण्यात आले. ही मोहीम राबवताना प्रचंड गुप्तता पाळली गेली होती. त्यानंतर राबवण्यात आलं ते रॅथ ऑफ गॉड हे गुप्त ऑपरेशन ज्या अंतर्गत ब्लॅक सप्टेंबरच्या सगळ्या दहशतवाद्यांना शोधून शोधून ठार करण्यात आलं. मोसादने या मोहिमेत १२ हून अधिक पॅलेस्टाईनी कट्टरपंथीयांना ठार शोधून मारलं.

### स्टिवन स्पिलबर्गचा सिनेमा म्युनिक

जगात दोन देशांमध्ये घडलेली ही घटना अशी होती की त्यावर कुणाला चित्रपट बनावावासा वाटला नसता तरच नवल होतं. स्टीवन स्पीलबर्गने या घटनेवर आधारित म्युनिक नावाचा चित्रपट दिग्दर्शित केला. या चित्रपटात ब्लॅक सप्टेंबर ग्रुपने केलेल्या हत्या आणि पुढे २० वर्षे चाललेली मोहीम रॅथ ऑफ गॉड यावर सविस्तर भाष्य करण्यात आलं होतं.

# भारताची पाकिस्तानवर कडक कारवाई, पाकिस्तानी अधिकाऱ्याला २४ तासात देश सोडण्याचे आदेश

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

भारताने नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील एका अधिकाऱ्याला अयोग्य कारवायांमध्ये सहभागी असल्यामुळे अयोग्य घोषित केले आहे. तसेच त्याला २४ तासात देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानला निवेदन जारी करून औपचारिक निषेध नोंदवला. हे पाऊल म्हणजे भारताची राजकीय प्रतिष्ठा आणि सुरक्षा धोरणांच्या उल्लंघनाविरुद्ध एक कडक संदेश आहे. भारत सरकारने नवी दिल्लीच्या पाकिस्तान उच्चायुक्तालयात तैनात



असलेल्या एका अधिकाऱ्याला पर्सना नॉन ग्राटा घोषित केले आहे. तसेच २४ तासांच्या आत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. हे पाऊल त्या अधिकाऱ्याच्या कारवाया लक्षात घेऊन उचलण्यात आले आहे, ज्याचा भारत त्याच्या राजनैतिक दर्जानुसार विचार करत नाही. परराष्ट्र मंत्रालयाने या संदर्भात पाकिस्तानच्या उच्चायुक्तांच्या चार्ज डी अफेयर्सना बोलावून एक डिमार्च (औपचारिक निषेध पत्र) सोपवले आणि या निर्णयाची अधिकृतपणे माहिती दिली. सरकारी सूत्रांनुसार, संबंधित अधिकारी भारतात त्याच्या अधिकृत अधिकारक्षेत्राबाहेरील संशयास्पद आणि अस्वीकार्य कारवायांमध्ये सहभागी असल्याचे आढळून आले. या कारवाया भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी संभाव्य धोका मानल्या गेल्या आहेत. भारत सरकारने अधिकृतपणे हे अधिकारी कोणत्या प्रकारच्या कारवायांमध्ये सहभागी होते हे सांगितले नसले तरी, त्याचे वर्तन राजनैतिक आचारसंहितेचे उल्लंघन करते हे स्पष्ट करण्यात आले. या कारवाईद्वारे भारताने पाकिस्तानला स्पष्ट संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे की राजनैतिक नियमांचे उल्लंघन खपवून घेतले जाणार नाही. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने असेही म्हटले आहे की जर कोणताही राजदूत त्याच्या निर्धारित कार्यक्षेत्राबाहेर गुप्तचर किंवा हस्तक्षेपकारी कार्यात सहभागी असल्याचे आढळून आले तर त्याच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल असा इशारा दिला आहे.

संपादकीय

# कळा ज्या लागल्या जीवा...

देशाच्या बहुतेक भागांत आता सरासरीपेक्षा वर जास्त तापमानाची नोंद होत आहे. सामान्य परिभाषेत त्याला उष्णतेची लाट म्हणतात. या मे महिन्यात या उष्णतेच्या लाटेत सामान्य जनजीवन होरपळून निघणार तर आहेच पण पशुपक्षी, वन्य प्राणी आणि कीडे कीटक यांनाही तीव्र उन्हाच्या झळा बसणार आहेत. दरवर्षीच हे होत असते आणि याला नॅचरल फिनॉमिनॉ म्हणतात. पण उत्तर भारत आणि महाराष्ट्राच्या काही भागांत जसे की, मराठवाड्यातील जिल्हे तसेच जळगाव आणि धुळे आदी भागात या दिवसात तीव्र उन्हाने तापनमानाचा पारा कितीतरी जास्त चढलेला असतो. भारतीय हवामान विभागाने जी महिती दिली आहे त्यानुसार हीट वेव्हज् या महिन्यात राजस्थान, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि गुजरात तसेच ओडिशाच्या भागात तसेच उत्तर कर्नाटक या प्रांतात या हीट वेव्हचा अनुभव येईल. आता या उष्णतेच्य लाटेचे कारण सांगता येईल की ग्लोबल वॉर्मिंग आणि हवामानातील बदल हेच आहेत.

वाढते जागतिक तापमान आणि ग्रीन हाऊस गॅसेस परिणाम यामुळे वारंवार उष्णतेच्या लाटा येतात. तसेच जी शहरे अधिक दाट वस्तीतील आहेत त्यांना हीट वेव्हचा सामना करावा लागतो असेही कारण सांगितले जाते. या सर्व कारणामुळे मुंबई आणि इतरत्र भारतात हीट वेव्हचा परिणाम जाणवतो असे दिसते. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, २०२५ हे वर्षे सर्वात हॉट वर्षे असेल असा अंदाज आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या आकडेवारीत म्हटले आहे की, २०२४ या वर्षी जितके तापमान होते त्यापेक्षा अधिक तापमान यंदा मार्च ते मे महिन्यात भारतात कित्येक ठिकाणी जाणवेल. उन्हाळा सुरू होताच अनेक ठिकाणी तापमान सरासरीपेक्षा वर गेलेले दिसते. त्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर घातक परिणाम होतो. कमाल तापमानातील वाढ ही सरासरी ६.५ पेक्षा जास्त नोंदवली जाते तिला त्याला उष्णतेची लाट आल्याचे मानले जाते. महाराष्ट्रात तर असा काळ आता येत आहे आणि त्याला आपण सर्वांनी ठामपणे सामोरे जायला हवे. जळगाव आणि अन्य जिल्ह्यात, तर उष्म्यामुळे उन्हाचा तडाखा ज्याला सनस्ट्रोक म्हटले जाते त्याचा धोका फार मोठा असतो आणि त्या घटना अटळ आहेत. पण त्यावर उपाय आहेत ते म्हणजे सतत शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम ठेवणे, उन्हाच्या तडाख्यात बाहेर न पडणे असे कित्येक उपाय आहेत. भारतातील पीकपाणी स्थितीवर उष्णतेच्या लाटेचा परिणाम होत आहे. गहू आणि तांदूळ तसेच इतर पिकांवर लक्षणीय परिणाम होतो आणि त्याचा परिणाम पिकाचे उत्पादन कमी होण्यावर होतो. पिकाची गुणवत्ता आणि प्रमाण कमी होते तसेच फळे, भाज्या आणि पशुधनावर उष्णतेच्या लाटेचा परिणाम होतोच. यंदा उच्च तापमानामुळे दुभत्या जनावरांची काळजी जास्त घ्यावी लागेल. त्यांची तहान भूक कमी होते आणि कित्येक तर जीव सोडतात. भारतात उष्णतेचा ताण आणि अनियमित हवामान यामुळे कृषी उत्पादनात लक्षणीय घट होते आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा घातक परिणाम होत असतो. हाच काळ असतो की जो गहू हंगामाचा असतो. भारतातील हवामान बदलामुळे भारताच्या गव्हाच्या उत्पादनावर गव्हाच्या उत्पादनाचा दर्जा आणि उत्पादनावर व्यापक परिणाम होतो. भारताने यंदाच्या फेब्रुवारीत सर्वाधिक उष्ण महिन्याची नोंद केली आहे. १२५ वर्षांतील हे रेकॉर्ड आहे. हवामान विभागाने मे महिन्यात धोक्याची घंटा वाजवली आहे की, यंदाचा मे महिना हा सर्वाधिक उष्ण महिना असेल. केवळ तापमान वाढ इतक्यापुरताच हा परिमाम नाही, तर एल निनोचा परिणाम भारताच्या कृषी उत्पादनावर होत असतो आणि त्यामुळे हीट वेव्हची दखल घ्यावी लागते. गहू हे भारतातील प्रमुख पीक आहे आणि गेल्या दोन ते तीन वर्षांपासून गव्हाने उत्पादनाचा उच्चांक गाठला आहे. यंदा पंजाब, हरियाणा, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेश या राज्यात सरासरीपेक्षा वर तापमान नोंदवले गेल्याने कृषी उत्पादनावरही त्याचा परिणाम होणार आहे. केवळ उन्हाचा तडाखा इतक्यापुरता हा परिणाम मर्यादित नाही तर भारताचे कृषी उत्पादन यावर एल निनोचा परिणाम होणार आहे. परिणामी भारताच्या जीडीपीवर त्याचा परिणाम होणार आहे. गहू हे भारताचे मुख्य पीक आहे. यंदा भारताने ११२.२ दशलक्ष अब्ज टन गहू उत्पादन २०२२ मध्ये नोदवले आहे.

कृषीमध्ये महत्त्वपूर्ण लोकसंख्येचा भाग हा गुंतलेला असतो. त्यामुळे उष्णतेची लाट आणि त्याचा पिकावर परिणाम याचा किती गहिरा परिणाम होणार आहे याचा अंदाज येईल. भारतीय हवामान खात्याने असेही म्हटले आहे की, हीट वेव्हमुळे गव्हाच्या उत्पादनावर परिणाम तितकासा होणार नाही. पण फळभाज्या लागवडीवर त्याचा परिणाम होईल. उष्णतेच्या लाटेचा परिणाम मनुष्याच्या आरोग्यावर ही होतो आणि हार्टस्ट्रोक्स आणि डिहायड्रेशनचा धोका असतो. तसेच रोगराई जसे की संसर्गजन्य रोगांचे प्रमाणही वाढते. त्यामुळे मानवाने सर्वंकष काळजी घेतली पाहिजे हे त्यावर उत्तर आहे. पाण्याचा पुरवठा, तर ग्रस्त होतोच आणि उन्हाळ्यातच टँकर मुक्त महाराष्ट्राच्या नुसत्या घोषणा झाल्या. पण त्यावर अंमलबजावणी झालीच नाही. टँकर आजही आहेत आणि टँकर लॉबीचे राज्य आहे. उन्हाच्या लाटेत तर त्यान टँकर लांबीवर तर कित्येकांचे साम्राज्य उभे राहिले आहे. त्याला कुणीही धक्का लावू शकलेले नाही. पण उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम होतो. तो उत्पादनावर आणि घटलेली व्यावसायिकता यामुळे लोकांचे उत्पन्न कमी होते. हा परिणाम फार मोठा होतो. मुंबईच नव्हे तर अर्धा भारत आज हीट वेव्हच्या तडाख्यात आहे. येत्या काही दिवसांत तो परिणाम वाढत जाणार आहे. त्यामुळे भारतीयांनी दक्ष राहिले पाहिजे आणि सरकार तसेच नागरिकांनीही आपल्याला उष्णतेपासून त्रास होऊ नये यासाठी काळजी घेतली पाहिजे.

# तनुजा निकमने दहावीत मिळवले 91.80% गुण; अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मिळविले घवघवित यश

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



कळवन येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी तनुजा चंद्रशेखर निकम हिने इ. १० वीच्या परीक्षेमध्ये ९१.८० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिचे वडील शेतकरी असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही तनुजाने अभ्यासात सातत्य ठेवून हे यश मिळवले आहे. तनुजाने कळवण येथील जानकाई प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले. तिच्या या यशाबद्दल शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोठावदे, मुख्याध्यापक एम. बी. जोशी, वर्गशिक्षक व्ही. एन. जाधव, पी. पी. पवार, आर. एस. अमृतकर आणि वैशाली कोतवाल यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. तनुजाच्या या यशामुळे कळवण परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# कृषी क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्यांना "महाराष्ट्र भूषण प्रेरणा पुरस्कार २०२५" जाहीर

## कृषीभूषण फेडरेशनच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण; शेतकरी कुटुंबासाठी मदतीचा हात

किशोर सोनवणे
म्हसरुळ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

कृषीभूषण महाराष्ट्र एफपीओ स्टार्टअप फेडरेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने "महाराष्ट्र भूषण प्रेरणा पुरस्कार २०२५" जाहीर करण्यात आले आहेत. फेडरेशनचे चेअरमन मा. भूषण निकम व संचालिका रोहिणी पाटील यांनी पुरस्कारांची अधिकृत घोषणा केली. हा पुरस्कार कृषीभूषण फेडरेशनच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यातील विविध जिल्ह्यांत कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १८ जिल्ह्यांतील ४५ प्रेरणादायी व्यक्तींना प्रदान केला जाणार आहे. हे पुरस्कार लवकरच विविध राजकीय लोकप्रतिनिधी, कृषी विभागातील मान्यवरांच्या हस्ते भव्य समारंभात वितरित करण्यात येणार आहेत. पुरस्कार सोहळ्याच्या विशेष क्षणी सामाजिक उपक्रमांतून पुढाकार घेत फेडरेशनच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी दोन लाख पंचवीस हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य आणि अन्नधान्याचे वाटप* करण्यात येणार असल्याचेही भूषण निकम यांनी सांगितले.

**पुरस्कार विजेते पुढीलप्रमाणे:**

डॉ. कैलास मोते (पुणे), आप्पासाहेब डावकर (बीड), योगेश किटुकले, उमेश बगणे, दत्तकृपा F P C (अमरावती), गोपाल इंगळे, प्रशांत बावस्कर (बुलढाणा), ज्योती भुक्तार, केशव वाघमारे (हिंगोली), इंद्रनील पाटील, नवनीत पाटील, सुरेश पाटील, अशोक जाधव, मातोश्री इंदुताई FPC (जळगाव), केरबा माने (कोल्हापूर), मोरेश्वर घोडे, योगेश कोकाटे, स्वप्निल ठाकरे (नागपूर), संदीप पवार, नारायण मुळाने, सुवर्णा काळे, निखिल गायकवाड, योगेश नेमणार, संदीप जाधव, विनायक शिंदे (नाशिक), मनोज वाकळे (पालघर), ज्ञानेश्वर आवळे, शिवाजी बनकर, विकास चव्हाण, संदीप सुके, शरदचंद्र लोहोकरे, पांडुरंग बरळ (पुणे), अनिल शिगवण (रत्नागिरी), विजय पाटील, सूर्यकांत पवार (संभाजीनगर), आनंदराव शिंदे, शुभम भोसले, किरण जोशी (सातारा), दत्तात्रेय राऊत, अश्विनी फुटाणे, अमोल देवकटे, सुरेश पवार (सोलापूर), गुणवंत ढोकणे, जगन भालेराव, रवींद्र गायकवाड (वाशिम). या पुरस्कारामुळे राज्यातील कृषी उद्योजकता, समाजभान आणि शेतीतील नवदृष्टीला बळ मिळणार असून या विजेत्यांचे कार्य हे इतरांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास फेडरेशनने व्यक्त केला आहे.

# नांदगाव तालूक्यातील १० वी परिक्षेचा निकाल ९५/४०टक्के

# न्यू इंग्लिश स्कूल चा निकाल ९१/०५ टक्के

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------







नांदगाव तालूक्यातील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेचा निकाल ९१/०५ टक्के लागला एकूण १९० विद्यार्थी परीक्षेत बसले होते पैकी १७३पास झाले प्रथम क्रंमाक शिव सोनवणे ९६% द्वितीय अमेय फणसे ९५/८० तृतीय ईश्वरी शिंदे ९१ % ठोंबरे प्रणव ९०/२० % गोटे क्षितिज ८९/८० % या सर्व यशस्वी विद्यालयाचे मविप्र सरचिटणीस श्री नितीनजी ठाकरे संचालक श्री अमित भाऊ बोरसे पाटील शालेय समिती अध्यक्ष श्री विजय काकळीज सर मुख्याध्यापिका श्रीमती काळे जे आर उप मुख्याध्यापक श्री थेटे सर पर्यवेक्षक श्री शेवाळे सर व सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले विद्यालयाचा निकाल ९१.५ टक्के लागल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

# नांदगाव शहरातील कमलाबाई माणिकचंद कासलीवाल विद्यालयाचा एस. एस. सी परीक्षा २०२५ चा १०० % निकाल

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------

नांदगाव शहरातील सौ. कमलाबाई माणिकचंद कासलीवाल विद्यालयातील कु. वाबळे पूनम संदीप ९३.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर कु. खैरनार ओम वाल्मीक ९२.६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर तृतीय क्रमांक कु. क्षीरसागर ओमकार किशोर ९१.८० टक्के गुण प्राप्त केले. तसेच कु. राऊत प्रेरणा गणेश ९१.२० टक्के गुण मिळवून चतुर्थ तर कु. शिंदे संस्कार सागर ९१.०० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक प्राप्त केला. यावर्षी परीक्षेस १११ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, प्राचार्य मनी चावला, मुख्याध्यापक शरद पवार, गोरख डफाळ, मुख्याध्यापक (प्राथ) विशाल सावंत तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# न्यू इंग्लिश स्कूल, साक्री – यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप!

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------

इयत्ता १० वी च्या निकालानंतर न्यू इंग्लिश स्कूल, साक्रीमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. या यशामध्ये मोलाचा वाटा उचलणाऱ्या विद्यार्थ्यांचे शाळेतील शिक्षक, प्राचार्य व संस्थाचालकांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळवले नाहीत, तर शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास, शिस्तबद्ध अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन यामुळेच हा घवघवीत निकाल शक्य झाला, असे शिक्षकांनी सांगितले.

"विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे त्यांच्या मेहनतीचे चीज आहे. आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो आणि भविष्यात ते आणखी मोठे शिखर गाठतील, याची खात्री आहे." शाळेतील यशाचा हा पर्वणीचा क्षण शिक्षक-विद्यार्थी संबंधांतील अतूट नात्याचे सुंदर प्रतीक ठरला आहे.

या वर्षीचा निकाल अत्यंत समाधानकारक ठरला आहे. विशेष म्हणजे, शाळेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विद्यार्थी हे KB क्लासेस चे विद्यार्थी असून, ही बाब KB क्लासेससाठी अत्यंत गौरवाची आहे. या घवघवीत यशानंतर K B क्लासेसतर्फे या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे. योग्य मार्गदर्शन, वेळेचे नियोजन, मेहनतीची शिस्त आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास यामुळेच हा उल्लेखनीय निकाल शक्य झाला, असे KB क्लासेसचे मार्गदर्शक सांगतात.

**यंदाचे यशस्वी विद्यार्थी**

१) भूपेंद्र किरण नेरकर – ९७.८०% (प्रथम क्रमांक)
२) मानसी दीपक नांद्रे – ९५.६०% (द्वितीय क्रमांक)
३) शर्वरी प्रवीण बच्छाव – ९५.४०% (तृतीय क्रमांक)

या यशामुळे KB क्लासेसची "उत्तुंग यशाची परंपरा" पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना यशस्वी करण्यासाठी K B क्लासेसने आपली गुणवत्ता आणि मार्गदर्शनाची परंपरा अशीच जपली जाईल, असा विश्वास संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आला

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# 14 मे छत्रपती संभाजी महाराज जयंती

## स्वाभिमानाची प्रेरणा देणारा छावा महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक



वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला.यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये"१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले.औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला.

त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत राहले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल.कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# शिवसेना महिला आघाडीकडून बुद्ध पोर्णीमे निमीत खिरदान वाटप

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

नांदगाव शहरातील विश्वशांती बुद्ध विहार कैलास नगर येथे वैशाख पौर्णिमेनिमित्त अंजुमताई कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडीच्या वतीने खीरदानाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध



व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बुद्ध वंदने नंतर उपस्थित महिलांना खीर देऊन वैशाखी पौर्णिमा साजरी करण्यात आली यावेळी कैलास नगर येथील सर्व ज्येष्ठ आणि परिसरातील महिला उपस्थित होत्या. यावेळी शिवसेना महिला आघाडीच्या नेहा ताई कोळगे वंदना पांडे विजया चतुर आशा पाटील जयश्री डोळे लता ताई पगारे संगीता साळवे माया अहिरे साबळे ताई लता मोरे मधुमती वाघ डांगरे ताई संगीता साळवे कल्पना सुरवाडे जया ताई जगताप विद्या कसबे विना पांडे रोशनी ठेंगे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या प्रसंगी मोठ्या प्रमाणात महिला उपस्थित होत्या.

# पुरुषप्रधान संस्कृतीला एकच सवाल - लग्नानंतर मुलगी, मुलगी राहत नाही का ? :-स्मिता गुलाबराव शेळके

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

जी एस महानगर सहकारी बँकेचा निवडणुकीचा बिगुल वाजला असतानाच , शुभेच्छा आणि सदस्यांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे मी खूप आनंदी आहे. परंतु , एक चुकीचे कथन माझ्याबद्दल तयार करण्यात आले आहे, ज्यामध्ये लग्नानंतर माझ्या गुजराती घराण्यातील वैवाहिक स्थितीचा चुकीचा संदर्भ घेतला जात आहे. या चुकीच्या प्रचाराला उत्तर देणे गरजेचे वाटते. माझ्या बद्दल चुकीचा प्रचार करून जाणीवपुर्वक सभासदांच्या मनात गैरसमज पसरविण्याचे काम काही व्यक्ती करत असून माझ्याबाबत चुकीचे आणि अनावश्यक मुद्दे उपस्थित करत आहेत , असे स्पष्ट प्रतिपादन जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या कन्या व संचालिका स्मिता गुलाबराव शेळके यांनी केले आहे .

त्या पुढे म्हणाल्या की , मी जी . एस . महानगर को-ऑपरेटिव्ह बँक गुजरातला नेणार आहे , असा खोटा आरोप माझ्यावर केला जात आहे , पण मी स्पष्टपणे सांगू इच्छिते की , मी कायदेशीर



आणि वैयक्तिकरित्या, नेहमीच स्मिता गुलाबराव शेळके आहे. माझे नाव माझ्या पालकांच्या वारसाचे आणि माझ्या संस्कारांचे प्रतीक आहे, ज्यांनी मला सत्यता आणि सेवा शिकवली आहे. माझे गुजराती घराण्यात लग्न झाले आहे, पण त्याचा अर्थ असा होत नाही की, मी माझ्या मूळ शेळके कुटुंबाचा भाग राहिलेली नाही. एका मुलीचे तिच्या कुटुंबाशी असलेले नाते लग्नामुळे कधीच संपत नाही. माझ्या मूळ घराण्याशी असलेले माझे प्रेम, निष्ठा, आणि मूल्ये कधीही कमी होणार नाहीत. माझ्या विरुद्ध पुर्वदोषी वैयक्तिक भूमिका घेत , जाणीव पुर्वक अशा चुकीच्या प्रचाराचा प्रसार करणाऱ्यांना मी सांगू इच्छिते की , तुम्हांला खरंच वाटते का ? की , मुली लग्नानंतर त्यांच्या मूळ कुटुंबाचा भाग राहात नाहीत ? तुमच्या स्वतःच्या मुलींना तुम्ही हा विचार लागू कराल का ? नाही ना, मग सार्वजनिक जीवनात नेतृत्व करण्याचा निर्णय घेतल्यामुळे माझ्या बाबतीच असा दृष्टिकोन का लादला जातो ? ही बाब फक्त माझ्यापुरती नाही, तर आपल्या समाजातील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक मुलीच्या स्थानासाठी आहे. जर आपण असे पुर्वग्रह टिकू दिले, तर आपण समर्पित आणि पात्र महिलांना सार्वजनिक सेवा व सामाजिक जीवनात नेतृत्व करण्यापासून परावृत्त करू .

बँकेसाठी आणि सभासदांच्या हितासाठी माझी बांधिलकी ही आहे की , जी एस महानगर सहकारी बँकेची संचालक म्हणून माझ्या दोन वर्षांच्या कार्यकाळात मी बँकेच्या विकासासाठी आणि सभासद , ठेवीदार , कर्जदार व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी काम केले आहे. विचारशील , समावेशक आणि समर्पित सेवा हे नेहमीच माझे उद्दिष्ट राहिले आहे. मग का माझ्यावर असे शाब्दिक हल्ले केले जात आहेत?

बँकेच्या सर्वांगीन प्रगतीसाठी मी एक नम्र आवाहन करते की , या फूट पाडणाऱ्या नकारात्मक प्रचाराला नाकारून सत्य समजावून घ्यावे . नेतृत्व, सेवा आणि बँकेच्या सदस्यांच्या हितासाठी समर्पण , समानता, सन्मान, आणि प्रगती यांचे मूल्य जपण्यासाठी आपण एकत्र उभे राहूया. एका न्याय्य आणि आधुनिक समाजात, कोणत्याही मुलीला तिचे कुटुंब किंवा समाजात तिचे स्थान सिद्ध करण्याची आवश्यकता नसावी. स्मिता गुलाबराव शेळके म्हणून माझ्या ओळखीवर मी ठाम आहे, असे ही स्मिता गुलाबराव शेळके म्हणाल्या.

> राज्याचे ज्येष्ठ नेते शरदराव पवार यांची कन्या खा . सुप्रिया सुळे , दिवंगत ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांची कन्या ना . पंकजा मुंडे या वडीलांचा व कुटुंबाचा वारसा पुढे चालवू शकतात , मग मी का वारसा चालवू शकत नाही , असे ही स्मिता गुलाबराव शेळके यांनी सांगितले

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत या विद्यालयाचा 98% निकाल

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

नाशिक सिडको उत्तम नगर जवळ असलेल्या दौलत नगर परिसरातील अंबिका मित्र मंडळ संचलित, माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत या विद्यालयाचा २०२४ - २०२५ चा शालांत परीक्षा इ.१०वी चा निकाल ९८.००% लागला आहे.

१)प्रथम क्रमांक कु. समीक्षा प्रमोद मोरे ८५.२०%

१) प्रथम क्रमांक कु.कावेरी मंगेश हांडे ८५.२०%

२) द्वितीय क्रमांक कु.जान्हवी भारत ताठे ८४.६०%

३)तृतीय क्रमांक - कु.मैत्रय विश्वास बच्छव ८४.४०%,

४)चौथा क्रमांक - कु.साक्षी विनायक मुर्तडक ८३.४०%,

५) पाचवा क्रमांक- कु.स्वरूप संजय नागरे ८२%.







### दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थिनींनीच बाजी

मारल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संदीप पाटील, नानासाहेब पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन यशवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना प्रोत्साहित केले. यावेळी पाटील, स्वप्निल पाटील,उपस्थित होते. सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे शब्दसुमनांनी कौतुक केले.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# दोधेश्वर पब्लिक स्कुलने अकराव्या वर्षीही कायम राखली १००% निकालाची परंपरा

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------


शुभम दिलीप सोनवणे ९४.६० % | हेमांगी चौधरी ९३.४० % | अवनी सोनवणे ९१.६० % | अच्युत सोनवणे ९१.४० % | भावार्थ मंजुळे ९०.४० %

दोधेश्वर पब्लिक स्कुलचे यंदा दहावीचं अकरावं वर्ष...सलग मागील दहा वर्षापासून शाळेने १००% निकालाची परंपरा राखत यंदा अकरा व्या वर्षीही १००% निकाल लागला आहे. यामध्ये शुभम दिलीप सोनवणे ९४.६० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवला तर हेमांगी चौधरी हिने ९३.४० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला तर अवनी सोनवणे हिने ९१.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. त्याच प्रमाणे अतुच्य सोनवणे याने ९१.४० तर भावार्थ मंजुळे याने ९०.४० गुण मिळवत अनुक्रमे चौथ्या व पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यावर्षीही सर्वच्या सर्व विद्यार्थी हे सत्तर टक्क्याच्या पुढे गुण मिळवून पास झालेत. संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रल्हाद पाटील, उपाध्यक्ष प्रा. शांताराम गुंजाळ सचिव श्रीमती. मनोहरा सुलू यांसह सर्व संचालक मंडळ, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी, पर्यवेक्षक दादा खरे यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी या सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती शेट्टी, माधुरी देवरे, वृषाली खैरनार, राहुल येशी यांचे मार्गदर्शन लाभले.

# दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाची तत्काळ दखल

## तलाठी आणि कृषी अधिकारी शेणपूर येथे दाखल; पंचनाम्याची कार्यवाही सुरू

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------

दैनिक स्वराज्यदूत मध्ये प्रकाशित झालेल्या बातमीनंतर तालुका प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. तालुक्यात शेणपूर गावात तालुक्यातील गावानमध्ये सद्यस्थितीची पाहणी करण्यासाठी तलाठी, कृषी अधिकारी तसेच इतर संबंधित शासकीय कर्मचारी गावात दाखल झाले आहेत. प्रशासनाच्या वतीने पंचनाम्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून, संभाव्य नुकसान व त्याचे स्वरूप याचा सविस्तर आढावा घेतला जात आहे. यामुळे गावकऱ्यांमध्ये प्रशासनाबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. या संदर्भात अधिक माहिती मिळवण्यासाठी स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रशासनाने त्यांचे म्हणणे जाणून घेतले. येत्या काही दिवसांत यासंबंधित अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

# डॉ. शानिलीनिताई बोरसे माध्यमिक विद्यालयाचा शालांत परीक्षा २०२४-२५ चा ९६.५०% निकाल

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



नाशिक मधील नामांकित शिक्षण संस्था अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालय, दौलत नगर, सिडको, नाशिक . २०२४ - २०२५ चा शालांत परीक्षा इयत्ता दहावी चा निकाल ९६.५०% लागला आहे. प्रथम क्रमांक - तंजीला मन्सूर बेग ९१% , द्वितीय क्रमांक- वैष्णवी प्रमोद मोरे ९०%, तृतीय क्रमांक- मयंक रवींद्र पाटील ८७.६०%, चौथा क्रमांक- साक्षी शंकर पाटील ८६.४०% ,पाचवा क्रमांक- दर्शन अतुल पवार ८६%. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थिनींनीच बाजी मारल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय बाळासाहेब पाटील व सचिव संदीप जी पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन यशवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना प्रोत्साहित केले. यावेळी प्रशासन अधिकारी आर.सी. सोनवणे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका - कविता देवकर मॅडम, शिक्षक के. बी. मोरे ,एल. पी. देसले, प्रतिभा दिवे, मनीषा पाटील, कदमबांडे सुरेंद्र सुनील पाटील, भाऊसाहेब भामरे उपस्थित होते. सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे शब्दसुमनांनी कौतुक केले.

# रावळगाव येथे तथागत भगवान बुध्द जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------





तथागत भगवान बुध्द यांची २५८७ वी जयंती पंचशिल नगर रावळगाव येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.प्रा.डॉ.स्वप्निल गरुड यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म या विषयावर सविस्तर व्याख्यान दिले. बुध्द जयंती ही नुसती भारतात साजरी होत नसून संपूर्ण जगात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते कारण बुध्दांनी जगाला सत्य, अंहिसा आणि समानतेचा संदेश दिला आहे.जगात आपल्या देशाची ओळख ही बुध्दाचा देश अशी आहे असा महान बुध्द धम्म आपल्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला आहे तो टिकवायचा असेल तर आपण बुध्दांचा विचार आचरणात आणला पाहिजे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा आचरणात आणल्या पाहिजेत असे प्रतिपादन डॉ.गरुड यांनी केले.तत्पूर्वी तथागत भगवान बुद्ध यांच्या मुर्तीचे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीचे पुष्पपुजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियांचे नाशिक जिल्हाध्यक्ष प्रशांत दादा गरुड यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी बुध्द वंदना,भिम स्तुती,भिम स्मरण घेण्यात आले यानंतर खीर दानाचा कार्यक्रम घेण्याता आला. कार्यक्रम यशस्वीते साठी गोकुळ पवार, सुरज धिवरे हंसराज जाधव, बंटी अहिरे, धर्मराज केदारे,प्रसाद उशिरे,देवांग खरे, विकास गवळी विशाल पवार, सागर वानखेडे, ओम वानखेडे, यांनी परिश्रम घेतले यावेळी श्री. रघुनाथ वानखेडे,मिलिंद केदारे,विश्वनाथ केदारे, साहेबराव खरे, जर्नादन पवार, विठ्ठल खरे, यशवंत वानखेडे,किशोर खरे इत्यादी कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# साकोरा येथील पेडकाई माता विद्यालयाचा निकाल 96.15 टक्के

सोमनाथ घोंगाणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

नांदगाव तालुक्यातील साकोरा येथील पेडकाई माता सामाजिक शैक्षणिक संस्था संचलित, माध्यमिक विद्यालया चा एस. एस. सी परिक्षेचा निकाल ९६.१५ टक्के लागला असून शाळेचे खालील विद्यार्थी आर्यन सुदर्शन सुरसे ९४ % (प्रथम)अदिती अनंत पाटील ८६ % (द्वितीय) शशिकांत शिवाजी घुगसे ८४/६० % (तृतीय) लकी शरद बोरसे ८४/४० %(चौथा ) रोहन जनार्दन शेवाळे ७९/२० (पाचवा ) गुण मिळवित उर्तीर्ण झाले. उतीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सचिव मुख्याध्यापक शिक्षण यांनी अभिनंदन केले

# नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, छडवेल -कोर्डे शाळेचा S.S.C चा९४ टक्के निकाल रितेश साळुंखे प्रथम

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------


छडवेल-कोर्डे केंद्रात प्रथम रितेश किशोर साळुंखे गुण ९४.८०% | छडवेल-कोर्डे केंद्रात द्वितीय नाव -कु. निशा संदिप साळुंखे गुण ९१.००% | छडवेल-कोर्डे केंद्रात तृतीय नाव -भावेश सुरेश मोरे ९०.८०%

छडवेल-कोर्डे केंद्रातील प्रथम व विद्यालयातील प्रथम विद्यार्थी - साळुंखे रितेश किशोर९४.८०%
द्वितीय विद्यार्थी- कु. साळुंखे निशा संदिप ९१.००%
तृतीय क्रमांक - मोरे भावेश सुरेश ९०.८०%

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मा. दादासाहेब पराग बेडसे, संस्थेचे सेक्रेटरी मा. भैय्यासाहेब अनिल सोनवणे, विश्वस्त मा. भैय्यासाहेब अॅड. गजेंद्र भोसले, मा. भाऊसाहेब दीपक अहिरराव, मा. आबासाहेब संजू पाटील, मा. अण्णासाहेब उत्तमराव बोरसे, सर्व सन्माननीय व्यवस्थापक मंडळ सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य मा.श्री.संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक मा.श्री.रघुनाथ नागरे, इ. १०वी चे सर्व मार्गदर्शक शिक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# जळगावमध्ये शरद पवार गटाच्या मेळाव्यात अजित पवार गटात विलिनीकरण..?

संदीप पाटील
जळगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------



जिल्ह्यातील दोन माजी मंत्री आणि दोन माजी आमदार तसेच इतर काही पदाधिकारी राष्ट्रवादीत (अजित पवार) गेल्याच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटात सोमवारी येथे आयोजित विशेष मेळाव्यात पक्ष संघटन वाढीवर चर्चा करण्याऐवजी भविष्यात शरद पवार यांनी अजित पवार गटात जाण्याचा निर्णय घेतल्यास तो आपण सर्वांनी मान्य करावा, अशी भूमिका काही प्रमुख नेत्यांनी घेतली. माजी मंत्री गुलाबराव देवकर, डॉ. सतीश पाटील यांच्यासह अनेक मातब्बर त्यांच्या समर्थकांसह अजित पवार गटात सामील झाल्यानंतर शरद पवार गटाची मोठी हानी झाली आहे. अशा स्थितीत पक्ष संघटन बळकटीसाठी आयोजित केलेल्या बैठकीला मोठ्या गळतीनंतर नेमके कोण उपस्थित राहते, त्याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. निरीक्षक भास्करराव काळे यांच्यासह विधानसभेचे माजी अध्यक्ष अरूण गुजराथी, ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे अमळनेरचे माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोडपे, जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, माजी अध्यक्ष अॅड.रवींद्र पाटील, महानगर अध्यक्ष एजाज मलीक, महिला आघाडीच्या मंगला पाटील, कल्पिता पाटील, उद्योजक श्रीराम पाटील आदी सर्वच प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. अजित पवार गटात गेलेल्या दोन्ही माजी मंत्र्यांसह, माजी आमदारांच्या प्रभावक्षेत्रातील जळगाव ग्रामीण, पारोळा, एरंडोल, धरणगाव, अमळनेर आदी तालुक्यांच्या कार्यकर्त्यांना सर्वात आधी बोलण्याची संधी मेळाव्यात देण्यात आली. त्यानुसार, बोलण्यासाठी उभे राहिलेल्या बऱ्याच जणांनी नेते सत्तेच्या लालसेने कुठेही जातात, पण कार्यकर्ते कायम पक्षाशी एकनिष्ठ राहतात. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान होत असल्याची खंत व्यक्त केली. दुसरीकडे, आमदार खडसे यांच्यासह पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, माजी अध्यक्ष अॅड.रवींद्र पाटील, महानगर अध्यक्ष मलीक आदींच्या बोलण्यातून शरद पवार आणि अजित पवार गट एकत्र आल्यास आपण सर्वजण पक्षाचा आदेश शिरसावंद्य मानू, असा सूर व्यक्त झाला. जोपर्यंत दोन्ही गटाच्या विलिनीकरणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत आपण आपले काम सुरू ठेवू. गरज पडल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये महायुतीशी संघर्ष करण्यासाठी तयार राहू, असेही संबंधितांनी मेळाव्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सांगितले. त्यामुळे काही वेळापूर्वी नेते कुठेही गेले तरी आम्ही शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहू, असे सांगणारे पदाधिकारी व कार्यकर्ते संभ्रमात पडल्याचे दिसून आले.


# माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा